# विद्यापीठ, सीईटी परीक्षांचे वेळापत्रक दोन दिवसांत

## ■ उदय सामंत यांची माहिती

**मुंबई** : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, राज्यातील विद्यापीठ, महाविद्यालय आणि सीईटी परीक्षेचे वेळापत्रक दोन दिवसांत जाहीर करण्यात येईल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी दिली.

राज्यातील सर्व कुलगुरूंशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे परीक्षेसंदर्भात नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर सामंत बोलत होते. या समितीचा अहवाल लवकरच राज्य शासनाला सादर केला जाईल. त्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याशी चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात येईल, असे ते म्हणाले. बैठकीत पदवी आणि पदव्युत्तर शेवटच्या वर्षाच्या परीक्षा १ जुलै ते १५ जुलै, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा २० ते ३० जुलैदरम्यान घेण्यात येतील का आणि या परीक्षांचा निकाल १५ ऑगस्टपर्यंत जाहीर करून १ सप्टेंबर २०२० पासून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात येईल का? तसेच लॉकडाऊनचा कालावधी विद्यार्थ्यांसाठी 'मानवी हजर दिवस' म्हणून ग्रा' धरण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले.

कॅरी फॉरवर्ड योजना लागू करून पुढील वर्गात प्रवेश देण्यात येईल आणि शेवटच्या वर्षाची परीक्षा घेण्यात यावी. एम.फिल व पीएचडीचा मौखिकी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून घेण्यात येऊन या विद्यार्थ्यांचा लघुशोधप्रबंध आणि प्रबंध सादर करावयाची मुदत निघून गेली असल्यास त्यांना मुदतवाढ देण्यात येईल का? यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन यावर अंतिम निर्णय घेण्यात येईल, असेही ते म्हणाले. या व्हिडीओ कॉन्फरन्सला उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, विभागाचे सचिव सौरभ विजय, संचालक धनराज माने, तंत्रशिक्षण संचालक डॉ. अभय वाघ तसेच सर्व विद्यापीठांचे कुलगुरू सहभागी झाले होते.

### विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन केंद्र

राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल'ांमध्ये एक आणि मोठ्या जिल'ांमध्ये दोन समुपदेशन केंद्रांची निर्मिती करण्यात यावी. समुपदेशन केंद्राच्या मदतीने संबंधित जिल'ातील पालक आणि विद्यार्थ्यांच्या सर्व अडचणीचे समाधान करण्यात यावे, अशा सूचनाही सामंत यांनी दिल्या.

### सीईटी परीक्षेसंदर्भात समिती गठित

बारावीनंतर अभियांत्रिकी आणि इतर अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा घेण्याबाबत महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. बारावीनंतर आणि पदव्युत्तरसाठी घेण्यात येणाऱ्या सीईटी परीक्षेचे नियोजन संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. या समितीने सर्व उपाययोजना करून आपले वेळापत्रक तयार करावे, असे ते म्हणाले.

पुढारी

संक्षिप्त



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केल्यानंतर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. विलास नांदवडेकर.

## डॉ. आप्पासाहेब पवार यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठात मंगळवारी त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य मानसिंग जगताप, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. मानसिंगराज निंबाळकर आदी उपस्थित होते. सुरक्षित शारीरिक अंतर पाळून हा कार्यक्रम करण्यात आला.

## विद्यापीठातर्फे औद्योगिक सुरक्षेविषयी १२ पासून ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळा

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठात १२ मे पासून 'औद्योगिक सुरक्षा' या विषयावर दोन दिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ पर्यावरणशास्त्र अधिविभाग व युनिव्हर्सिटी इंडस्ट्री इंटरॅक्शन सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) 'स्ट्राईड' योजनेंतर्गत कार्यशाळा होत आहे.

कार्यशाळेत पर्यावरणतज्ज्ञ पंकज कदम, सुरक्षा व्यावसायिक वाय. एस. मुळे, अमेय काळे, सागर अहिवाळे औद्योगिक सुरक्षाविषयक विविध मुद्यांवर ऑनलाईन मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेत देशभरातून १५० जणांना सहभागी होता येणार आहे. नोंदणीसाठी https://forms.gle/jAeUoExkb1bYGZih9 या लिंकला भेट द्यावी, असे आवाहन पर्यावरणशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी केले आहे.

लोकमत

# विद्यापीठात राष्ट्रीय कार्यशाळा १२ पासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात दि. १२ मे पासून 'औद्योगिक सुरक्षा' या विषयावर दोनदिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. ही कार्यशाळा विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र अधिविभाग व युनिव्हर्सिटी इंडस्ट्री इंटरॅक्शन सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली आहे, अशी माहिती पर्यावरणशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी दिली.

कार्यशाळेत पर्यावरणतज्ज्ञ पंकज कदम, सुरक्षा व्यावसायिक वाय. एस. मुळे, पिडीलाइट इंडस्ट्रीजचे अमेय काळे आणि ग्रीन सोल्युशन्सचे संचालक सागर अहिवाळे मार्गदर्शन करणार आहेत. दोन्ही दिवशी सकाळी ११.३० वाजता कार्यशाळेस होईल.

Hello Kolhapur
Page No. 3 May 06, 2020
Powered by: erelego.com

# डॉ. आप्पासाहेब पवार यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठात मंगळवारी त्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य मानसिंग जगताप, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. मानसिंगराज निंबाळकर आदी उपस्थित होते. सुरक्षित अंतर पाळून हा कार्यक्रम करण्यात आला.

# दोन दिवसांत विद्यापीठ परीक्षा वेळापत्रक

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई



विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील विद्यापीठ, कॉलेजांच्या परीक्षांसह सीईटीचे वेळापत्रक दोन दिवसांत जाहीर करण्यात येईल. एकाही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, असे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी स्पष्ट केले. परीक्षांसंदर्भात नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालावर मंगळवारी राज्यातील सर्व कुलगुरूंशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी सामंत यांनी ही माहिती दिली.

पदवी आणि पदव्युत्तर शेवटच्या वर्षांच्या परीक्षा १ जुलै ते १५ जुलै, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) २० ते ३० जुलै २०२० दरम्यान घेण्यात येतील का आणि या परीक्षांचा निकाल १५ ऑगस्टपर्यंत जाहीर करून १ सप्टेंबर २०२० पासून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात येईल का, या मुद्द्यांवर बैठकीत चर्चा झाली. तसेच, लॉकडाउनचा कालावधी विद्यार्थ्यांसाठी मानवी हजर दिवस म्हणून ग्राह्य धरण्यात यावा, कॅरी फॉरवर्ड योजना लागू करून पुढील वर्गात प्रवेश देण्यात यावा आणि शेवटच्या वर्षाची परीक्षा घेण्यात यावी, अशा सूचनाही यावेळी करण्यात आल्या.

एम.फिल व पीएचडीची मुलाखत व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून घेण्यात यावी या मुद्द्यावरही यावेळी चर्चा करण्यात आली.

# औद्योगिक सुरक्षेविषयी १२ मेपासून कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात १२ मे पासून 'औद्योगिक सुरक्षा' या विषयावर दोन दिवसीय ऑनलाइन राष्ट्रीय कार्यशाळा होणार आहे. पर्यावरणशास्त्र अधिविभाग व युनिव्हर्सिटी इंडस्ट्री इंटरॅक्शन सेंटरच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा होईल. पर्यावरणशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी ही माहिती दिली.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 'स्ट्राईड' या योजनेंतर्गत कार्यशाळा होत आहे. यात डॉ. राऊत यांच्यासह पर्यावरणतज्ज्ञ पंकज कदम, सुरक्षा व्यावसायिक वाय. एस. मुळे, पिडीलाइट इंडस्ट्रीजचे अमेय काळे आणि ग्रीन सोल्युशन्सचे संचालक सागर अहिवाळे हे औद्योगिक सुरक्षाविषयक विविध मुद्यांवर मार्गदर्शन करतील. मंगळवार व बुधवार या दोन्ही दिवशी सकाळी साडेअकरा वाजता कार्यशाळा सुरू होईल. देशभरातून १५० जणांना सहभागी होता येईल. इच्छुकांनी नोंदणीसाठी https://forms.gle/jAeUoExkb1bYGZih9 या लिंकला १० मेपर्यंत भेट द्यावी, असे आवाहनही डॉ. राऊत यांनी केले आहे.

# विद्यापीठात 'औद्योगिक सुरक्षा' राष्ट्रीय कार्यशाळा

## दोन दिवसीय ऑनलाईन कार्यक्रम : १० मे पर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात येत्या १२ मे पासून 'औद्योगिक सुरक्षा' या विषयावर दोन दिवसीय ऑनलाइन राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा विद्यापीठाचा पर्यावरणशास्त्र अधिविभाग व युनिव्हर्सिटी इंडस्ट्री इंटरॅक्शन सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती पर्यावरणशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. पी.डी. राऊत यांनी दिली.

डॉ. राऊत यांनी दिलेल्या माहितीनुसार,



विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) 'स्ट्राईड' या योजनेअंतर्गत मंगळवार (१२ मे) व बुधवार (१३ मे) असे दोन दिवस औद्योगिक सुरक्षाविषयक ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळा आयोजित केली आहे. कार्यशाळेत डॉ. राऊत यांच्यासह पर्यावरणतज्ज्ञ पंकज कदम, सुरक्षा व्यावसायिक वाय.एस.मुळे, पिडीलाइट इंडस्ट्रीजचे अमेय काळे, ग्रीन सोल्युशन्सचे संचालक सागर अहिवाळे हे औद्योगिक सुरक्षाविषयक विविध मुद्यांवर ऑनलाइन मार्गदर्शन करणार आहेत. सकाळी ११.३० वाजता कार्यशाळेस प्रारंभ होणार आहे. कार्यशाळेत देशभरातून अधिकतर १५० जणांना सहभागी होता येणार असून इच्छुकांनी नोंदणीसाठी संकेतस्थळावर १० मे पर्यंत नोंदणी करावी असे आवाहनही डॉ. पी.डी.राऊत यांनी केले आहे.

# विद्यापीठात २५ टक्के कर्मचाऱ्यांची उपस्थिती

**कोल्हापूर :** राज्य शासनाने झोनप्रमाणे लॉकडाऊन शिथिल करण्याचा निर्णय घेतला. यामध्ये कोणती कार्यालये सुरू राहणार आहेत व त्यात किती कर्मचारी असावेत हे देखील निर्देशीत करण्यात आले आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठात २५ टक्के कर्मचारी उपस्थित होते. कोरोनाचा प्रार्दुभाव टाळण्यासाठी सर्व विद्यापीठे बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र प्रशासकीय काम सुरू होते. लॉकडाउन सुरू झाल्यानंतर बहुतांशी कर्मचाऱ्यांनी घरातून काम केले. त्यानंतर आवश्यकतेनुसार कर्मचारी, अधिकारी येत होते. लॉकडाउन शिथिलतेनंतर २५ टक्के कर्मचारी उपस्थित होते.